आणि अभिनय करून जातात. शंखासूर आणि विष्णूच्या संवादानंतर येथे शंखासूर मारला जातो आणि कूर्म व वराह यांची अवताराची फक्त रूपेच दाखविली जातात. तसेच नरसिंह अवताराला सुरूवात होऊन या नाटयनिर्मिती होते. यामध्ये एकूण पाच पात्रे असतात. त्यांची नांवे पुढील प्रमाणे – हिरण्यकशिपु, कयाधू, प्रल्हाद, भालदार व नृसिंह यांच्या अवतरामधील अनेक प्रसंग दाखविले जातात. वामन अवतारात वामन आणि बली ही दोनच पात्रे आहेत. परंतु येथे परशुरामाचा उल्लेख आढळतो. राम आणि कृष्णाचा अवतारही लोकप्रिय आहे. यातील प्रसंग ही नाटय सुलभ आहेत. येथेच नाटयाची सुरवात होते ख–या अर्थाने नाटय निर्माण होते आणि नाटयाचा मूळ प्रारंभ झाला असे म्हटले जाते.

### *दशावतार नाटयाची परंपरा :*

दशावतार नाटकात सूत्रधार प्रमुख असतो. इतर पात्रे आपापली भूमिका साभिनय करतात. त्यांचे संवाद ही मजेदार असतात. सांखासुरासारखा विनोदी आणि विनोदाचा बादशहा म्हणून त्यांची लोकप्रियता पाहिली. रंगभूमीवर नाटयाची सुरवात पाहिली. महाराष्ट्रामध्ये कोकणातील विविध ठिकाणच्या जत्रा, यात्रा उत्सवाच्या शेवटी दशावताराचा खेळ होतात. ही परंपरा जुनी आहे. दशावताराच्या परंपरेविषयी चिं. कृ. दीक्षित लिहितात, 'श्यामजी नाईक काळे हे पूर्वी कर्नाटक प्रांती होते. तेथून येथे (आडिक्यास) आले. त्या वेळी बरोबर 'दशावतार नाटक' हे नवीन चीज म्हणून आणून ते लोकांपुढे ठेवले.' म्हणजेच कर्नाटकामधून उत्तर कोकणमध्ये हा दशावतारी खेळ रूढ झाला. या खेळाचे स्वरूप पूर्णपणे करमणूक प्रधानच आहे. इ. स. 1728 च्या काळात दशावतारी नाटके होत असत. पुढे इ. स. 1736 मध्ये आंग्रे दरबाराने फकीरजी आंग्रे यांच्या लग्नप्रसंगी काळे–बुवा यांचे दशावतार खेळ झाले आहेत. विष्णुदास भावे यांच्या काळातही हे खेळ होत होते. संत रामदास काळात ही खेळ होत असत. पुढे काही काळ थंडावली. तंजावर येथेही परंपरा चालत राहीली नंतर ही नाटके पौराणिक संहितेवर आधारित झाली आहेत असेही दिसते.

### *दशावतार खेळातील विविध विषय :*

दशावताराची परंपरा संत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आणि संत रामदास यांच्या काळात आणि त्यांनी ही संदर्भ दिले आहेत. यामधून लोकांचे रंजन करण्यासाठी संतांनी रचना लिहिल्या आहेत असे पुरावे मिळतात. दशावतारी नाटक मंडळींनी धार्मिक विषय हाताळले आहेत. पुराणातील काही प्रसंगावर लिहिले आहेत. म्हणजेच पौराणिक विषय आणि त्यातील महत्वाची पाउत्रेही निवडली. त्यानंतर ऐतिहासिक नाटके व आधुनिक काळात सामाजिक नाटके लिहिले आहेत. धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक आणि सामाजिक स्वरूपाचे विषय निवडलेले दिसतात.

गोमांतक आणि दक्षिण कोकणात दशावतारी खेळ होतात. याच परिसरातील देवस्थानाच्या जत्रेमध्ये दशावतारी नाटके ही आवश्यकच असतात. ही नाटक मंडळी आजही सावंतवाडी, वेंगुर्ले, मालवण येथे आहेत. गोमांतकातील नाटके (दशावतार खेळ), 'सोंग' स्वरूपाची असतात. यामधील पात्रे लाकडी मुखवटे वापरतात. दरवर्शी त्याला रंगरंगोटी केली जाते. कार्यक्रमाच्या निमित्ताने ती नाटकात वापरतात. गणपति, राक्षस, पूतना यांचे मुखवटे असत फक्त सरस्वतीलाच नसतो.

### *रंगभूमीवरील पात्रांचा प्रवेश :*

दशावतार खेळामध्ये पात्रे वाद्यानुसार नृत्य करतात. यामध्ये सूत्रधार भाशण करत आणि त्यासोबत पद्यरचना सादर करतो त्याच्या साथीला मृदंग आणि झांज ही महत्वाची वाद्ये असतात. सूत्रधार गजाननाला आवाहन करतो तर सरस्वतीची स्तुती केली जाते. सरस्वती दोन पायामध्ये लाकडी मोर धरी, हाताने त्याची मान पकडत आणि उजव्या हातामध्ये हातरूमाल, त्याचबरोबर वाद्यांच्या तालावर नाच करीत उभी असते. दैव आणि राक्षसांचे युध्द सुरू होते आणि ख–या अर्थाने प्रेक्षकांचे मुख्य आकर्षण असते ते युध्दप्रसंगच. पुढे काय होणार याचे कुतूहल असते. आणि शेवटी शंखासूर येतो त्याचे सर्वांग काळया कापडाने झाकलेले असते आणि जीभ बाहेर काढून डोळे याठिकाणी मोठे छिंद्र असते एकूणच रौद्ररूप धारण केलेले असते. येथे नाटयनिर्मिती होते आणि प्रेक्षकांना वेगळाच आनंद मिळतो. त्या आनंदाचे सुखात्म स्वरूप दिसून येते. पात्रांचा प्रवेश हाही सुखात्म असाच असतो.

दशावतारामध्ये दहिकाला आणि गौळणकाला असे दोन भाग आहेत. वि. कृ. जोशी यांनी दशावतारी खेळांची रंगभूमीची स्थित्यंतरे कशी झाली आहेत याचे विवेचन केले. संस्कृत, प्राकृत आणि प्रदेश यावरून याचे बदल झालेले आहेत हे स्पष्ट केले आहे. दशावतारीखेळामध्ये वंदनगीत, नमनगीत, स्तुतीगीत सादर केले जाते. त्यानंतर संहिता सादर करून लोकांची करमणूक केली जाते. यानिमित्ताने संगीतावर आधारित एक पद सादर करून लोकांना गीत ऐकण्याची कलाही देतात. पुढील पद वि. कृ. जोशी यांच्या ग्रंथातून जसेच्या तसे देत आहे.–

पद  
अखिल चराचर ज्याचे देही ।  
रक्षि तुम्हां तो प्रभुजि सदाही ।।धृ.।।  
उत्पत्ती लय पालन करण्या ।  
ब्रह्माहरिहर रूप जो घेई ।।1।।  
गाईल नच कृष्णगुणाते ।  
संशय माझ्या आणुनि हृदयी ।।2।।  
बालकृष्ण वांछित पुरवो जो ।  
गोपी–जन–मन, मोहक होई ।।3।।

असे पद गावून झाल्यानंतर अचानक गौळणी दहीदूध घेऊन येतात त्यांचा एकामागोमाग एक असा प्रवेश होतो. हा त्यांचा नाटयात्मक प्रवेश वि.कृ. जोशींच्या ग्रंथातून घेतला आहे. प्रस्तुत अभ्यासकांस थोडयाफार फरकाने कोल्हापूर परिसरात वाचायला मिळाला परंतू त्याचे विस्कळीत रूप असल्याने जोशींच्या ग्रंथातील उद्धृत करतो –

कलावती – लवकर या गे मथुरेसी । जाऊ गोरस विकण्यासी  
सखयानो, झाले तासद्वय रविसी । बघ येऊनया  
उदयासी । सखयानो ।।  
कळले हे जरी त्या हरिसी । पाडितो ग आम्हाशी फशी ।  
सखयांनो  
(चाल) गोरसाय लुब्ध हंस सा । मौक्तिका तसा ।  
म्हणुनी मानसी भय दिसे पाहतां त्यासी । सखयांनो ।।  
चिमणी – हे कलावती, अशी धावतेस कशाला ?

थांब बाई ही मी आले । उठायाला आज मी फसले ।
रात्री पतिने मज जागविले । सासूनेही नच उठविले ।।
नाही तर रोज तुझ्या आधी उठून तुला उठवायला तुझ्या घरी येत नव्हते का ?
कलावती – कोण, चिमणी का ?ये ये बाई लवकर ! नाही तर रोजचा
वैरी आम्हास गाठील तर फजितीसा पात्र होऊ,
आणखी कोणी मागे आहे काय ?
चिमणी –मागे कोणी नाही ?

कलावती – कां गे करिताा अशि घाई । मी येते हो बाई ।।
सासूने हे नवनीत भारी । दिधले या मम डोई ।
नच उचले पद जोर करी तरी, फारचि मान दुखे ही ।
सासूसासरा दीर नणदा की, या परि त्रासिति गे ही ।
तीक्षणचि शब्द नित्य सुखविती, सौख्य न देते कदा ही ।

चिमणी –ये ये कोकिळे, ये ये लवकर. उशीर होत आला.

(सर्व गौळणी 'गोविंद घ्या कुणि दामोदर घ्या' हे पद म्हणतात.) येथे कृष्ण येतो त्याचा पैद्या आणि यशोदा अशी एकेक पात्रे येऊन ही संहिता खुलवत नेतात. आणि प्रेक्षकांना एक सुखात्म अनंद मिळतो. म्हणून दशावतार हा भन्नाट रंजनप्रधान लोककला प्रकार आहे. त्याचे प्रयोग रूप असल्याने रंगभूमीवरच सादर केला जातो.

***संदर्भ ग्रंथ :***

1.लोकनाटयाची परंपरा – वि.कृ. जोशी
2.भेदिक ऐकीव रंग आविष्कार – महादेव देशमुख

